# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या पहिल्या सभेचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.२४ डिसेंबर, २०१० दुपारी १२:०० वा.

**अधिसभेची पहिली सभा शुक्रवार, दि.२४/१२/२०१० रोजी दुपारी १२:०० वा.** विद्यापीठ सभागृहात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. कदम बी. बी. शिक्षण सहसचांलक सोलापूर विभाग (मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. संचालक म. व वि. वि. मं. - पदसिध्द | सदस्य |
| ४) | डॉ. नवले एस. एम. | सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. (प्रभारी) ग्रंथपाल | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. चिट्टे जी. एन. | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. | सदस्य |
| ९) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. गोसावी एस. एन. | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| १३) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| १४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १५) | प्राचार्य डॉ. पुजारी ए. जी. | सदस्य |
| १६) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| १७) | प्राचार्या श्रीमती वडवान एम. ए. | सदस्या |
| १८) | श्री. डोंगरे एम. एस. | सदस्य |
| १९) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| २०) | श्री. गांधी आर. एच. | सदस्य |
| २१) | श्री. रोंगे बी. पी. | सदस्य |
| २२) | श्री. सपाटे एम. जी. | सदस्य |
| २३) | श्रीमती कदम एम. एस. | सदस्या |
| २४) | श्रीमती कुरापाटी एस. बी. - अध्यक्ष विद्यार्थी मंडळ | सदस्या |
| २५) | श्रीमती शिंदे एस. टी. - सचिव विद्यार्थी मंडळ | सदस्या |
| २६) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. -कुलसचिव | सचिव |
| २७) | डॉ. बिराजदार बी. एस. | सदस्य |
| २८) | डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| २९) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| ३०) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| ३१) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| ३२) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ३३) | डॉ. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ३४) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| ३५) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ३६) | डॉ. बारबोले ए. एन. | सदस्य |
| ३७) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |
| ३८) | डॉ. श्रीमती दळवी आर. जे. | सदस्या |
| ३९) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ४०) | डॉ. श्रीमती आपटे एस. एस. | सदस्या |
| ४१) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ४२) | डॉ. श्रीमती रणनवरे जे. डी. | सदस्या |
| ४३) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ४४) | आमदार श्री. शिंदे बी. व्ही. | सदस्य |
| ४५) | आमदार श्री. साळुंखे-पाटील डी. बी. | सदस्य |
| ४६) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ४७) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ४८) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ४९) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ५०) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ५१) | श्रीमती विभूते एस. बी. | सदस्या |
| ५२) | श्री. व्हनकळस डी. डी. | सदस्य |
| ५३) | श्रीमती जमादार एम. पी. | सदस्या |
| ५४) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ५५) | श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ५६) | श्री. जमादार के. एम. | सदस्य |
| ५७) | श्री. वडगावकर पी. पी. | सदस्य |
| ५८) | श्री. शेळके बी. बी. | सदस्य |
| ५९) | श्री. रुपनर बी. ए. | सदस्य |
| ६०) | श्री. वाघमोडे एस. ए. | सदस्य |
| ६१) | श्री. रिसबुड एस. एच. | सदस्य |
| ६२) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ६३) | डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| ६४) | डॉ. अशोककुमार ई. एन. | सदस्य |
| ६५) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ६६) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ६७) | डॉ. जोशी पी. बी. | सदस्य |
| ६८) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ६९) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ७०) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ७१) | डॉ. नारायणपेठकर ए. बी. | सदस्य |
| ७२) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| ७३) | डॉ. गवळी आर. एस. | सदस्य |
| ७४) | श्री. देशमुख एस. ए. | सदस्य |

**<u>स्वागतः</u>**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

डॉ. गेंगजे एस. आर. यांनी पत्राद्वारे, आमदार श्रीमती शिंदे पी. एस. व ॲड श्रीमती पाटील एस. एन. यांनी दूरध्वनीद्वारे अधिसभेच्या पहिल्या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

I) कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा.कुलगुरुंनी अहवाल सादर केला. सदरचा अहवाल सोबत जोडपत्र "अ" नुसार जोडला आहे.

II) कुलसचिवांनी सर्व अधिसभा सदस्यांची सभागृहाला ओळख करुन दिली.

सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

अधिसभेची पहिली सभा असल्याने कार्यवृत्तांत वाचून कायम करण्याचा विषय नाही.

[ 1 ] Elections to the Management Council by amongst the members of the Senate under Section 27 (1) (c), (j), (k), (l), (m), (o) as per Maharashtra Universities Act 1994.

[Note: Following members are to be elected to the Management Council from amongst members of Senate.

[I] One Dean (under Section 27 (1) (c))

[II] Two Principals of whom one shall be belonging to the category Other Backward Classes (under Section 27 (1) (j))

[III] a) One Teacher with Ten Years Post Graduate teaching experience who is not a Head / Director of University Department / Institutions (under Section 27 (1) (k))

b) If not available then at least 5 years PG teaching experience.

[IV] Two Teachers of affiliated colleges with Sixteen Years teaching experience who is not Principal of whom one shall be woman (under Section 27 (1) (l))

[V] One person who is not a Dean / Head / Director of University Department / Principal / Teacher / Student member / representative of management (under Section 27 (1) (m))

[VI] Two Representatives of Management of whom one shall be a woman (under Section 27 (1) (o))].

**Resolution:**

**A) The following elections are declared unopposed.**

**[II] Two Principals (u/s 27 (1) (j))**

**a) Prin. Shri. Pawar S. K. b) Prin. Dr. Ganage K. N. (OBC)**

**[III] One PG Teacher (under Section 27 (1) (k) : Dr. Suryavanshi S. S.**

**[IV] One Woman Teacher (27 (1) (l)) : Dr. Smt. Yajmanya S. R.**

**[V] One persons (under Section 27 (1) (m)) : Adv. Shri. Salgar B. S.**

**[VI] Representative of Managements (woman) is vacant.**

**B)** For all other elections the candidates themselves are appointed as scrutiniers by the house. Voting started at 12:40 p.m. and closed at 1:30 p.m. Total 73 Voters casted their votes.

**The counting of votes started at 1:35 p.m. and following candidates declared duly elected on the Management Council.**

**[I] One dean u/s 27 (1) (c) - Dr. Suryawanshi A. B.**

**[IV] One Teacher u/s 27 (1) (l) Dr. Shilimkar T. N.**

**[VI] Representative of Managements u/s 27 (1) (o) Shri. Gaikwad B. R.**

[ 2 ] Nomination of One Head / Director on Management Council from amongst the Heads or Directors of University Departments or University Institutions under Section 27 (1) (h) of Maharashtra Universities Act, 1994.

[Note: Any member present at the meeting may propose a name of any Head / Director for nomination on Management Council but the same name may be seconded by other member. The names for nomination are more than one then the nomination shall be determined by majority votes.

As per the eligibility conditions of the Govt. Orders 14th September, 2009 and the list of eligible Heads of Department of the University is enclosed herewith].

**Resolution:**

**Dr. Suryavanshi S. S. has proposed the name of Prof. Dr. Lonikar S. V. and Prin. Shri. Pawar S. K. has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Since there was only one name of Prof. Dr. Lonikar S. V., Hence, Prof. Dr. Lonikar S. V. nominated by the house unanimously on the Management Council.**

[ 3 ] Nominations of Four Members (out of them one Dean and One Teacher) on Standing Committee from amongst the members of the Senate under Section 50 (2) (a) of the Maharashtra Universities Act, 1994.

[Note: As per Maharashtra Universities Act, 1994 Section 50 (2) (a), Senate will nominate 4 members (out of them one shall be the Dean and one shall be a Teacher) on Standing Committee. Any member present at meeting may propose the name and that the same name may be seconded by any other member.
If the names for nomination are proposed more than the above numbers, the nominations shall be determined by majority of votes].

**Resolution:**

**A) Shri. Gaikwad R. S. has proposed the name of Dr. Pawar N. B. and Dr. Bhosale U. V. has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Hence, Dr. Pawar N. B. nominated from amongst the Deans on Standing Committee by the house.**

**B) Dr. Bacute M. T. has proposed the name of Dr. Kolekar T. N. and Shri. Chougule S. S. has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Hence, Dr. Kolekar T. N. nominated from amongst the Teachers on Standing Committee by the house.**

**C) Smt. Vibhute S. B. has proposed the name of Shri. Ronge B. P. and Dr. (Smt.) Dalvi R. J. has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Hence, Shri. Ronge B. P. nominated on Standing Committee by the house.**

**D) Dr. Shinde S. V. has proposed the name of Prin. Dr. Deshmukh A. L. and Shri. Shinde R. B. has seconded the same. No other name was proposed by any other members present in the house. Hence, Prin. Dr. Deshmukh A. L. nominated on Standing Committee by the house.**

[ 4 ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३५ (२) (JA) अन्वये अधिसभा सदस्यामधून महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर दोन सदस्याचे नामनिर्देशन करण्यास्तव. या दोन सदस्यांपैकी एक सदस्य महाविद्यालयीन संस्था प्रतिनिधी असावा.

(टिपणी :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - मध्य उप - विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि. १८ ऑगस्ट २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या विविध प्राधिकरणाचा कार्यकाल दि. ३१.०८ .२०१० रोजी संपुष्टात आलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३५ अन्वये नव्याने महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समिती गठीत करणे आवश्यक आहे. कलम ३५ (२) (ja) अन्वये महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर अधिसभेमधून दोन सदस्यांचे नाम निर्देशन करण्याचे आहे.

Maharashtra University Act 1994 Section 35 (2) (ja) -: Two members nominated by the Senate, one of them being the representatives of the Managements.

या तरतूदीनुसार दोन सदस्यांचे नामनिर्देशन करताना त्यापैकी एक महाविद्यालयीन संस्था प्रतिनिधी असावा.

अधिसभा सदस्याने नामनिर्देशनासाठी सुचविलेल्या नावास दुसऱ्या सदस्याने अनुमोदन केले पाहिजे. अधिकची नावे सुचविण्यात आल्यास मताधिक्याने नामनिर्देशन ठरविण्यात येईल).

**ठराव :**

**अ) डॉ. बारबोले ए. एन. यांनी श्री. रोंगे बी. पी. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहातून सुचविण्यात न आल्याने श्री. रोंगे बी. पी. यांचे संस्थाप्रतिनिधीमधून महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर सभागृहाने नामनिर्देशन केले.**

**ब) डॉ. कोळेकर टी. एन. यांनी डॉ. भोसले यु. व्ही. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. भिलेगावकर एस. डी. यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहातून सुचविण्यात न आल्याने डॉ. भोसले यु. व्ही. यांचे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर सभागृहाने नामनिर्देशन केले.**

[ 5 ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७ (३) (ba) अन्वये तक्रार निवारण समितीवर अधिसभा सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्यास्तव. दोहोंपैकी एक महाविद्यालय संस्था प्रतिनिधी महिला असावी व एक शिक्षक असावा.

(टिपणी :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - मध्य उप - विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि. १८ ऑगस्ट २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार विद्यापीठ पहिल्या विविध प्राधिकरणाचा कार्यकाल दि. ३१.०८ .२०१० रोजी संपुष्टात आलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७ (३) अन्वये नव्याने तक्रार निवारण समिती गठीत करणे आवश्यक आहे. कलम ५७ (३) (ba) अन्वये तक्रार निवारण समितीतील दोन सदस्यांचे नाम निर्देशन करण्यास्तव म.वि.कायदा १९९४ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

Two members of the Senate nominated by the members of the Senate, from amongst themselves, one of them being the woman representative of the management and one shall be a teacher.

दोन सदस्यांचे नामनिर्देशन करताना त्यापैकी महाविद्यालय संस्था प्रतिनिधीपैकी एक महिला प्रतिनिधी व एक शिक्षक असावा.

अधिसभा सदस्याने नामनिर्देशनासाठी सुचविलेल्या नावास दुसऱ्या सदस्याने अनुमोदन केले पाहिजे. अधिकची नावे सुचविण्यात आल्यास मताधिक्याने नामनिर्देशन ठरविण्यात येईल).

ठराव : **अ) श्री. गायकवाड बी. आर. यांनी श्रीमती कदम एम. एस. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. चव्हाण सी. एस. यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहातून सुचविण्यात न आल्याने श्रीमती कदम एम. एस. यांचे संस्थाप्रतिनिधीमधून तक्रार निवारण समितीवर सभागृहाने नामनिर्देशन केले.**

**ब) डॉ. श्रीमती दळवी आर. जे. यांनी डॉ. बारबोले ए. एन. यांचे नाव सुचविले आणि त्यास डॉ. गायकवाड एस. पी. यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहातून सुचविण्यात न आल्याने डॉ. बारबोले ए. एन. यांचे तक्रार निवारण समितीवर शिक्षकामधून सभागृहाने नामनिर्देशन केले.**

[ 6 ] Interpellations:
[The copy enclosed].

- प्रश्नोत्तराचा तास दुपारी २:३० वाजता सुरु झाला व कोणतेही प्रश्न नसल्याने दुपारी ३:२३ वाजता संपला.
- प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "ब")

[ 7 ] अधिसभा सदस्या श्रीमती एम. एस. कदम यांनी खालील ठराव मांडला व त्यास प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या नॉर्मनुसार व महाराष्ट्र शासनाच्या जी. आर. नुसार व विद्यापीठ अनुदान मंडळानूसार १२ - ब / (12-B) संलग्नित महाविद्यालयांना स्वायत्तता मिळवण्यासाठी विद्यापीठात समिती गठीत करावी. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सुचनेनुसार दहा टक्के महाविद्यालयांना स्वायत्तता घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जी. आर. काढलेला आहे. त्या त्या भागातील शैक्षणिक गरजा लक्षात घेवून उद्योगावर आधारीत अभ्यासक्रम निर्माण करुन महाविद्यालय स्वायत्त झाल्यास विद्यापीठ अनुदान मंडळाकडून रुपये ८ कोटी मंजूर होवू शकतात. म्हणून विद्यापीठाने स्वायत्तता घेण्यासाठी महाविद्यालयांना प्रोत्साहित करण्यासाठी समिती गठित करावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्रीमती कदम एम. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ 8 ] अधिसभा सदस्या श्रीमती डॉ. स्वर्णलता राघव याजमान्य यांच्या वतीने श्रीमती विभूते एस. बी. यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. श्रीमती दळवी आर. जे. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात परिक्षेचे कामकाज चालू असताना विद्यापीठाकडून पाठवावयाच्या स्कॉडमध्ये महिलांना पाठविताना एका स्कॉडमध्ये कमीत कमी दोन महिलांचा समावेश करावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्रीमती विभूते एस. बी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ 9 ] अधिसभा सदस्य श्री. राजेंद्र भगवान शिंदे यांनी खालील ठराव मांडला आणि त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठातील सर्वच्या सर्व अथवा जास्तीत जास्त विद्याशाखेत पीएच.डी. ची सोय करण्यात यावी व त्यासाठी आवश्यक त्या तरतूदी व सोयीसुविधा करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्याशाखेस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ 10 ] अधिसभा सदस्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड यांच्या वतीने डॉ. भोसले यु. व्ही. यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्री. देशपांडे ए. व्ही. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठ परिक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या भरारीपथकाचे कामकाज कार्यक्षमतेने होण्यासाठी भरारी पथकासाठी विद्यापीठाने वाहनाची चालकासह व्यवस्था करावी अशी विनंती व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.
कारण वाहनाच्या व्यवस्थेमध्येच भरारी पथकाची कार्यक्षमता वाया जाते.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. भोसले यु. व्ही. यांनी यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ 11 ] अधिसभा सदस्य डॉ. शिळीमकर तुळशिदास निवृत्ती यांच्या वतीने श्री. चौगुले एस. एस. यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्री. कोकरे एम. बी. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठ क्षेत्रातील विधी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वयाची असलेली अट लागू करु नये व कोणत्याही वयाच्या विद्यार्थ्याला विधी महाविद्यालयात प्रवेश देण्याची तरतूद करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्याशाखेस व व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ 12 ] अधिसभा सदस्या श्रीमती डॉ. रजनी जयंत दळवी यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी सोलापूर शहर व परिसरातून जाण्या येण्यासाठी सिटी बसेसची आवश्यक त्या वेळेत व्यवस्था करावी अशी विनंती सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागास करावी, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ 13 ] अधिसभा सदस्य डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्री. चौगुले एस. एस. यांनी अनुमोदन दिले.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया प्रत्येक वर्षाच्या १ जूनपर्यंत पूर्ण करावी अशी विनंती विद्यापीठाने महाराष्ट्र शासनास करावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ 14 ] अधिसभा सदस्य श्री. अनिल वसंतराव देशपांडे यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. बारबोले ए. एन. यांनी अनुमोदन दिले.

प्रत्येक महाविद्यालयात प्राध्यापकांची (प्रोफेसर) १० टक्के पदं भरण्यासाठी महाराष्ट्र सरकारने काढलेल्या सरकारी आदेशाप्रमाणे (जी.आर.) परिनियमात दुरुस्ती करुन त्याप्रमाणे पदं भरावीत असा आदेश सर्व महाविद्यालयांना करावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ 15 ] अधिसभा सदस्या श्रीमती डॉ. रजनी जयंत दळवी यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. बचुटे एम. टी. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठातील पीएच.डी. प्रवेशपूर्व परिक्षेचा (PET) निकाल, प्रश्नपत्रिका व त्याची उत्तरपत्रिका निकाल लागल्यापासून चार दिवसाच्या आत विद्यापीठाच्या वेबसाईटवर देण्यात यावेत. अशी शिफारस ही अधिसभा विद्यापीठ प्रशासनास करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. श्रीमती दळवी आर. जे. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ 16 ] अधिसभा सदस्य श्री. राजेंद्र भगवान शिंदे यांनी खालील ठराव मांडला व त्यास प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठातील विनाअनुदानित असलेले विद्या विभाग अनुदानित करण्यासाठी पाठपुरावा विद्यापीठ प्रशासनाने महाराष्ट्र शासनाकडे करावा, असा ठराव ही अधिसभा करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ 17 ] अधिसभा सदस्य डॉ. मधुसूदन त्रिंबक बचुटे यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. भोसले यु. व्ही. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठातील परीक्षेच्या संबंधातील सर्व कामं परीक्षेचा अनुभव म्हणून समजण्यात यावे, अशी शिफारस ही अधिसभा विद्यापीठ प्रशासनास करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. बचुटे एम. टी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ 18 ] अधिसभा सदस्य डॉ. सयाजीराव पांडुरंग गायकवाड यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. काशीद एस. एस. यांनी अनुमोदन दिले.

"School of Life Sciences" ची स्थापना करण्याची शिफारस अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस व इतर संबंधिताना करावी.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ 19 ] अधिसभा सदस्या श्रीमती एम. एस. कदम यांनी खालील ठराव मांडला व त्यास प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठ सोलापूरची स्थापना होवून सहा वर्षे झाली. विद्यापीठ अनुदान मंडळाकडे १२ ब च्या संलग्नीकरणासाठी प्रस्ताव करुन त्यास मंजूरी मिळविणे महत्वाचे आहे. गेल्या पंचवार्षिक योजनेमध्ये व या पंचवार्षिक योजनेमध्ये दसपटीने वाढ झालेली असल्याने आणि गेल्या पंचवार्षिकमध्ये अनुदान शिल्लक राहिल्याने केंद्र शासनाकडे अनुदान परत गेल्याचे समजते. त्यासाठी विद्यापीठाने १२ ब शी संलग्नीकरण करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. सोलापूर विद्यापीठाला प्रत्येक वर्षाला ५० कोटी रुपये अनुदान मिळू शकले असते. आजपर्यंत या विद्यापीठाचे सहा वर्षात ३०० कोटी रुपयाच्या निधीला मुकावे लागले आहे. विद्यापीठातील महाविद्यालयाला युजीसीकडे २-एफ (2F) व १२ बी (12-B) संलग्नीकरण झाल्यास मुलींचे वसतीगृह, स्वायत्त महाविद्यालय, इनोव्हेटिव्ह, करिअर ओरीएन्टेशन प्रोग्रॅम, मर्जड स्किम, लघु व दिर्घ संशोधन प्रकल्प या व इतर अशा माध्यमातून अनेक प्रस्ताव विद्यापीठामार्फत जावू शकले असते. म्हणून सोलापूर विद्यापीठाची युजीसीकडे 12-B चे संलग्नीकरण मिळविण्यासाठी समिती गठीत करावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव श्रीमती कदम एम. एस. यांनी सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ 20 ] अधिसभा सदस्य श्री. राजेंद्र भगवान शिंदे यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्री. कोकरे एम. बी. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठ परिक्षेत्रातील पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांची फी माफक व नियमानुसार ठेवावी अशी शिफारस ही अधिसभा विद्याशाखेस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. शिंदे आर. बी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ 21 ] अधिसभा सदस्या श्रीमती एम. एस. कदम यांनी खालील ठराव मांडला व त्यास प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठाचे निर्मिती झाल्यापासून विद्यापीठातील महाविद्यालयांना प्रोत्साहित करुन कायम संलग्नीकरण कसे मिळविता येईल याचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करावी. महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान मंडळाकडे १२-ब शी संलग्नीकरण मिळविल्यास केंद्र शासनाकडून विद्यापीठ अनुदान मंडळाकडे येणाऱ्या विविध प्रकल्पासाठीच्या अनुदानाचे प्रस्ताव सादर करता येतात. केंद्र शासनाने भारतामध्ये परदेशी विद्यापीठांना येण्यासाठी व स्वायत्तता देवून गुणवत्ता वाढीसाठी विद्यापीठातंर्गत स्पर्धा निर्माण केली आहे. या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठातील महाविद्यालये गुणवत्तेच्या दृष्टीने जगाच्या नकाशावर यावीत यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयांना कायम संलग्नीकरण देण्यासाठी समिती गठीत करावी अशी शिफारस अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्रीमती कदम एम. एस. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव, अधिसभा**

सही/-
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष, अधिसभा**

**विद्यापीठ सर्वसाधारण परिनियम क्र.४७४ (१) अन्वये अधिसभेस**
**मा. कुलगुरू महोदय यांनी विद्यापीठाचा प्रगती अहवाल खालीलप्रमाणे सादर केला**

# आस्थापना विभाग :

१. **प्रशासकीय कर्मचारी :**

अ. विद्यापीठास आकृतीबधांनुसार २१० प्रशासकीय पदांना मंजूरी मिळाली असून आजमितीस १०५ प्रशासकीय सेवक कार्यरत आहेत व त्यापैकी १३ पदे शासकीय कंत्राटी आहेत. तसेच खाजगी कंत्राटदारामार्फत ८८ कर्मचारी कार्यरत आहेत, असे एकूण १९३ प्रशासकीय सेवक विद्यापीठात कार्यरत आहेत.

ब. वर्ग ३ व ४ या संवर्गातील रिक्त पदाबाबतची जाहिरात दि.०८/०३/२०१० रोजी प्रकाशित करण्यात आली होती. परंतू दिनांक ५ जून, २०१० च्या शासन निर्णयानुसार सदर प्रक्रिया प्रलंबित ठेवण्यात आली आहे.

२. **शिक्षक :**

विद्यापीठात विविध संकुलात/अधिविभागात ०८ प्राध्यापक, ०८ सहयोगी प्राध्यापक व ४७ सहाय्यक प्राध्यापक असे एकूण ६३ शिक्षक कार्यरत आहेत. यापैकी ०१ प्राध्यापक, ०१ सहयोगी प्राध्यापक व ३१ सहाय्यक प्राध्यापक कंत्राटी तत्वावर कार्यरत आहेत.

३. **माहिती अधिकार अधिनियम २००५ :**

गेल्या तीन वर्षात माहिती अधिकार कायदयान्वये एकूण **७१९** अर्ज प्राप्त झालेत त्यापैकी **७०६** अर्ज निकाली काढण्यात आले. प्रथम अपीलिय अधिकारी यांचेकडे **७४** अर्जावर सुनावणी झाली. तसेच राज्य माहिती आयुक्त यांचेकडे **६** अर्जावर सुनावणी झाली.

# अभ्यासमंडळे विभाग :

- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सर्व विद्याशाखातंर्गत पदवी प्रथम वर्षास सत्र पध्दती अभ्यासक्रम सर्व संलग्नित महाविद्यालयात सुरु करण्यात आला आहे.
- M.Phil/Pre-Ph.D. चा अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे सुधारित करुन, शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून अंमलबजावणी करण्यात आली आहे.
- शै. वर्ष २०१०-११ पासून विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाना "क्रेडीट व ग्रेडींग सिस्टीम" लागू करण्यात आलेली आहे.
- डॉ. अनंत आणि लता लाभसेटवार प्रतिष्ठान, नागपूर व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने "डॉ.अनंत आणि लता लाभसेटवार व्याख्यानमाला", पहिली व्याख्यानमाला प्रा.हरी नरके, पुणे यांच्या २५-१-१० च्या व्याख्यानाने कार्यान्वित करण्यात आली आहे.
- बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी युनियन, औरगांबाद व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरी व्याख्यानमाला "कॉ. प्रभाकर यादव स्मृती व्याख्यानमाला" या नावे सुरू करण्यात आली. याअंतर्गत श्री पी.साईनाथ यांचे २२-१०-२०१० रोजी व्याख्यान झाले.
- सर्व विद्याशाखांतर्गत सुधारित केलेली सत्र पध्दती अभ्यासक्रम विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
- संशोधन करणा-या विद्यार्थ्यांकरिता त्यांचे संशोधन निबंध विविध संशोधन नियतकालिकात प्रसिध्दीकरणासाठी आवश्यक असलेली नियतकालिकांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

## पदव्युत्तर प्रवेश व पात्रता विभाग :

- विद्यापीठातील संकुलात तीन वर्षात पदव्युत्तर स्तरावर खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

| अ.क्र | शैक्षणिक वर्ष | एकूण विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | २००८-०९ | ५७५ |
| २. | २००९-१० | ४८६ |
| ३. | २०१०-११ | ८३६ |

- प्रवेशित विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्तीचा व शुल्क सवलतीची माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्र | शैक्षणिक वर्ष | एकूण प्राप्त रक्कम | |
|---|---|---|---|
| | | भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रीशीप | इतर शिष्यवृत्ती |
| १. | २००८-०९ | ३२,२२,२३०/- | ६३०००/- |
| २. | २००९-१० | ६२,८८,१४०/- | ६३९३५/- |
| ३. | २०१०-११ | २७,७३,०००/- | -- |

## विद्यार्थी कल्याण विभाग :

गेल्या तीन वर्षात विद्यार्थी कल्याण विभागातर्फे खालील प्रमाणे बक्षीसे प्राप्त केलेली आहे. इंद्रधनुष्य युवा महोत्सव यामध्ये सन २००७-२००९ मध्ये १ बक्षीस, सन २००८-०९ मध्ये ८ बक्षीसे, सन २००९-१० मध्ये ३ बक्षीसे व सन २०१०-११ मध्ये ६ बक्षीसे प्राप्त केली. तसेच पश्चिम विभागिय युवा महोत्सवाअंतर्गत सन २००७-२००९ मध्ये १ बक्षीस, सन २००८-०९ मध्ये १ बक्षीस, सन २००९-१० मध्ये २ बक्षीसे व सन २०१०-११ मध्ये २ बक्षीसे प्राप्त केली. याच बरोबर सन २००९-१० मध्ये राष्ट्रीय स्तरीय युवा महोत्सव, रोहतक येथे २ २ बक्षीसे प्राप्त केली.

## क्रीडा विभाग :

गेल्या तीन वर्षात क्रीडा विभागाने अनेक बक्षीसे प्राप्त केलेली आहेत. सन २००७-०८ महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ अश्वमेध क्रीडा स्पर्धामध्ये (उंच उडी व भाला फेक) ब्रांझ पदक व अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ज्यूदो स्पर्धमध्ये कास्य पदक प्राप्त केले. सन २००८-०९ मध्ये आंतर विद्यापीठ अश्वमेध क्रीडा १५०० मीटर धावणे-सुवर्ण पदक व व्हालीबॉल महिला संघ व बास्केट बॉल पुरूष संघ-कास्य पदक पटकावले. सन २००९-१० महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ अश्वमेध क्रीडा स्पर्धामध्ये (व्हालीबॉल महिला)-सुवर्ण पदक व सन २०१०-११ मध्ये बास्केट बॉल पुरूष संघ, १०० ehVj धावणे व २०० ehVj धावणे कास्य पदक आणि अखिल भारतीय आंतर fविद्यापीठ बुध्दीबळ स्पर्धा चेस बोर्ड fविजेता पुरस्कार मिळाला.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग :

गेल्या तीन वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत ठळक घडामोडीचा अहवाल खालीलप्रमाणे.

शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये ४ स्वयंसेवकांना राज्यस्तरीय पुरस्कार व शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज यांना उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळाला. सन २००८-०९ चा महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ठ विद्यापीठ पुरस्कार व उत्कृष्ठ कार्यक्रम समन्वयक म्हणून प्रा. तुकाराम शिंदे यांना पुरस्कार २०१० मध्ये मिळाला. सन २००९-१० मध्ये विद्यापीठातील ४८२ एकरात एकूण ७७ दिवसाचे श्रम संस्कार शिबीराचे आयोजन करुन श्रमदानातून जवळ जवळ ३५ कि.मी. चे चर तयार करणे, झाडासाठी खड्डे तयार करुन झ ाडे लावण्यात आली. उन्हाळी शिबीराचे आयोजन करून एक लाख पंचवीस हजार रोपाची निर्मिती केली. सन २०१०-११ मध्ये **उत्कर्ष** राज्यस्तरीय सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजन दिनांक १७ ते १९ डिसेंबर २०१० रोजी विद्यापीठात करण्यात आले होते. त्यात पथसंचलन, भारतीय लोककला, भारतीय ताल सुरवाद्य, पथनाट्य, निबंध, संगीत विभाग (फिरता चषक) व उत्कृष्ठ पथसंचलन यास प्रथम क्रमांक व रा.से.यो. कार्यप्रसिध्दी अहवाल व समूह गीत स्पर्धा प्रकारात द्वितीय क्रंमाक तसेच भित्तीचित्र प्रकारात तृतीय क्रंमाक मिळाले. वरील कामगीरीमुळे विद्यापीठास **सर्वसाधारण विजेतेपद** प्राप्त झाले.

## आरोग्य केंद्र :

- सर्व रुग्नांना २ दिवसाची औषधे मोफत देण्यात येतात.
- विद्यार्थी व कर्मचारी वर्गामधे आरोग्य विषयक जागरुकता निर्माण व्हावी याकरिता आजअखेर एकूण २४ आरोग्य शिबीरे आयोजित केलेली आहेत.
- अविष्कार २००९, उत्कर्ष २०१०-२०११ तसेच विद्यापीठाच्या परिसरातील रा.से.यो. शिबीरात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांकरिता २४ तास आरोग्य सेवा पुरविण्यात आलेली आहे.

## अभियांत्रिकी विभाग :

- **गेल्या तीन वर्षात विद्यापीठातील विविध संकुलास खालील बांधकामे पूर्ण झाली.**

| अ.क्र. | बांधकामाचा तपशिल | झालेला खर्च (` लाखात) |
|---|---|---|
| १ | संगणकशास्त्र संकुल इमारत | १७५ |
| २ | सामाजिक शास्त्रे संकुल इमारत | १७२ |
| ३ | मुलांचे वसतिगृह इमारत | १६२ |
| ४ | मुलींचे वसतिगृह इमारत | ८५ |
| ५ | व्ही.आय.पी.अतिथीगृह इमारत | ८४ |
| ६ | भूशास्त्र संकुल इमारत | २१५ |
| ७ | शास्त्रीय उपकरणे कक्ष इमारत | २४ |
| ८ | अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण | ४० |
| ९ | वातानुकुलित सभागृह | ३० |
| १० | सोलर स्ट्रीट लाईट | १० |
| ११ | परिसरातील दुभाजकामध्ये झाडे लावणे व लॉन करणे | २ |
| १२ | सोलर वॉटर हिटर सिस्टीम | १५ |

- **खालील बाधंकामे प्रगती पथावर आहेत.**

| अ.क्र. | बांधकामाचा तपशिल | झालेला खर्च (` लाखात) |
|---|---|---|
| १ | मुलांचे वसतिगृह येथे रेक्टर निवास | १३ |
| २ | मुलांचे वसतिगृह येथे मेस भाग-१ इमारत | २२ |
| ३ | मुलांचे वसतिगृह येथे मेस भाग-२ इमारत | २२ |
| ४ | सुरक्षा भिंत | २३ |
| ५ | मुलींचे वसतिगृह येथे मेस रेक्टर निवास, सुरक्षा भिंत, पाण्याची टाकी | ७० |
| ६ | सामाजिक शास्त्रे संकुल इमारत पहिला मजला | ६८ |
| ७ | कायमस्वरुपी व्यासपीठ | २४ |
| ८ | अंतर्गत रस्त्याच्या बाजूला झाडे लावणे | २.५० |
| ९ | अंतर्गत रस्त्यावर झाडांसाठी ड्रीप सिस्टीम करणे | ०.९५ |

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ :

### संलग्नता विभाग

विद्यापीठ स्थापनेवेळी ६१ महाविद्यालये संलग्नित होती. सद्य:स्थितीत १२३ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत. वर्ष निहाय मान्यता दिलेल्या महाविद्यालयांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | नव्याने मान्यता दिलेल्या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| १ | १ ऑगस्ट २००४ पूर्वी | ६१ |
| २ | २००४-०५ | ०१ |
| ३ | २००५-०६ | ०५ |
| ४ | २००६-०७ | ०८ |
| ५ | २००७-०८ | ०९ |
| ६ | २००८-०९ | १२ |
| ७ | २००९-१० | २३ |
| ८ | २०१०-११ | १० |
| **एकूण** | | **१२९*** |

*यापैकी ०३ महाविद्यालये बंद झाली व ०३ महाविद्यालये इतर विद्यापीठाशी संलग्नित झाली.

- संलग्नित महाविद्यालयापैकी ४१ अनुदानित व ८२ विनाअनुदानित महाविद्यालये आहेत. त्यापैकी ३५ महाविद्यालयाचे निरंतर संलग्नीकरण, ३१ महाविद्यालयाचे २ फ, आणि २१ महाविद्यालयाचे १२ ब झाले आहे
- शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाचा दीर्घकालीन तसेच शै.वर्ष २०११-१२ या एका वर्षाचा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्यात आलेला आहे.
- एकूण १२३ महाविद्यालयातील नॅक मूल्यांकनासाठी पात्र असलेल्या ५६ महाविद्यालयांपैकी ३५ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झालेले आहे व दोन महाविद्यालयांना N.B.A. मानांकन प्राप्त आहे.
- स्थानिक चौकशी समिती सदस्यांसाठी आदर्श आचार संहिता तयार करण्यात आलेली आहे.
- विद्यापीठ विकास निधीचा वापर विद्यापीठाच्या विकासाकरिता करण्यासाठी आराखडा (Action Plan) तयार करण्यात आलेला आहे.

## शिक्षक मान्यता विभाग

- संलग्नित महाविद्यालयातील ४१ अनुदानित महाविद्यालयापैकी ३५ महाविद्यालयातील प्राचार्याची पदे भरली आहेत व ६ पदे रिक्त आहेत तसेच ८२ कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील ५० पदे भरली असून ३२ पदे रिक्त आहेत.
- डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयास Colleges with Potential for Excellence (CPE) Year of 2009-10 या महाविद्यालयाची निवड झाली. याअंतर्गत Colleges with Potential for Excellence साठी ` १ कोटी व For strengthening of infrastructure साठी ` 65.00 लाख अनुदान मंजूर झाले.
- महाविद्यालय निहाय संशोधन प्रकल्पांना मिळालेल्या अनुदानाची माहिती सांख्यिकी स्वरुपात दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | वार्षिक | वित्तिय संस्था | महाविद्यालयांची संख्या | अधिव्याख्यातांचे संख्या | एकूण मंजूर रक्कम लाखात ` |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००४-२००५ | विद्यापीठ अनुदान आयोग | ११ | १० | ०३.५० |
| २ | २००५-२००६ | विद्यापीठ अनुदान आयोग | ०७ | १४ | ०७.२७ |
| ३ | २००६-२००७ | विद्यापीठ अनुदान आयोग | ०८ | १७ | ०९.५९ |
| ४ | २००७-२००८ | विद्यापीठ अनुदान आयोग | १० | २५ | २१.०९ |
| ५ | २००८-२००९ | विद्यापीठ अनुदान आयोग | ०८ | २७ | १८.७० |
| ६ | २००९-२०१० | विद्यापीठ अनुदान आयोग | १० | ४१ | ५९.०१ |
| | | RGSTC -1 | ०१ | -- | १७.४० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ICSSR-1 | ०१ | -- | ०४.९१ |
| | | ICSARMDD-1 | ०१ | -- | ०३.४२ |
| ७ | २०१०-२०११ | विद्यापीठ अनुदान आयोग | ३५ | ५५ | ५०.८६ |
| | | **एकूण** | **९२** | **१८९** | **१९५.७८** |

## विशेष कक्ष

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून राजीव गांधी फेलोशिपखाली विद्यापीठातील विद्यार्थिनीस एम्.फिल. साठी स्कॉलरशिप ` २,५०,०००/- चा धनाकर्ष विद्यापीठाकडे प्राप्त झालेला असून तो संबधित विद्यार्थिनीस तो आदा केलेला आहे.

## जनविकास केंद्र

अहवाल वर्षात जनविकास केंद्रामार्फत खालील प्रमाणे संस्थेस मान्यता दिले असून त्याप्रमाणे विद्यार्थी संख्या आणि अभ्यासक्रमाची संख्या दर्शविलेली आहे.

| अ.क्रं | शैक्षणिक वर्ष | संस्थेची संख्या | विद्यार्थी संख्या | अभ्यासक्रमसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २००७-२००८ | ३४ | ४१५ | ०९ |
| २ | २००८-२००९ | ४७ | ५०७ | ११ |
| ३ | २००९-२०१० | ५३ | ५०३ | १३ |
| ४ | २०१०-२०११ | ४६ | ८५ | ३ |

## पीजी बीयुटीआर विभाग

- पीएच.डी. पदव्युत्तर प्रयोगशाळा मान्यता असलेली एकूण संशोधन केंद्र **: १३**
- एम.फिल. मान्यता प्राप्त संशोधन केंद्र **: ०९**
- विद्यापीठ अनुदान आयोग, एम.फिल./पीएच.डी. रेग्युलेशन-२००९ प्रमाणे प्रवेशपरीक्षा घेऊन २४१ विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रवेश दिला.

# वित्त व लेखा विभाग

- विद्यापीठ स्थापनेपासूनच लेखा विभाग संगणीकृत करण्यात आलेला आहे. जमा पावत्यासह सर्वच व्यवहार संगणीकृत करण्यात आले आहेत.
- मा.महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाकडून विद्यापीठाचे लेखापरीक्षण (A.G. Audit) झालेले आहे.
- सन २००९-२०१० पर्यन्तचे अंतर्गत लेखा परीक्षण पूर्ण झालेले आहे.
- संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्याकडून प्राप्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहावा वेतन आयोगानुसार वेतननिश्चितीचे काम वेळेत पूर्ण करुन देण्यात आलेले आहे.

# परीक्षा विभाग :

विद्यापीठाने खालील शैक्षणिक वर्षात दर्शविल्याप्रमाणे परीक्षा घेतल्या आहेत.

| अ.क्रं | सन | एकूण अभ्यासक्रम | एकूण परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | २००७-२००८ | ४० | १७५ |
| २ | २००८-२००९ | ५२ | २१७ |
| ३ | २००९-२०१० | ५८ | २४८ |
| ४ | २०१०-२०११ | ६७ | ३०५ |

सन २००९-२०१० मध्ये विद्यापीठाच्या पाचव्या पदवीदान समारंभात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रसोबत स्मार्ट कार्ड देण्याची योजना सोलापूर विद्यापीठाने प्रथमच राबविली आहे.

सही/-

**कुलगुरु**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## प्रश्नोत्तरे

**अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे**

**श्रीमती कदम एम. एस.**

**प्रश्न क्र. १/१:** दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढावर विद्यापीठाने शासनाकडे शिफारस केल्यानूसार शासनाने प्रशासकाची नियुक्ती केली आहे काय ?

**प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे**

उत्तर : अद्याप नाही.

उपप्रश्न : प्रशासक नसल्यास या महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज पहाण्याचा श्री संत दामाजी महाविद्यालयातील प्राचार्य / प्रा. एन. बी. पवार यांना विद्यापीठाच्या कोणत्या स्टॅट्यूट व कायद्याने प्राचार्य म्हणून मान्यता दिली ?

उत्तर : प्राचार्य म्हणून मान्यता दिलेली नाही.

उपप्रश्न : केलेली बाब कायदेशीर आहे काय ?

उत्तर : होय.

उपप्रश्न : दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी प्रा.एन.बी. पवार यांचीच निवड का केली ?

उत्तर : विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असल्याने त्यांची निवड केली.

उपप्रश्न : त्यांना मान्यता देण्यासाठी कोणाचा प्रस्ताव होता का ?

उत्तर : स्टॅटयूट १९३(ब) नुसार प्रा.एन.बी. पवार यांना दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी मा. कुलगुरूंच्या अधिकारात मान्यता दिलेली आहे.

**प्रश्न क्र. २/१** श्री. संत दामाजी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य म्हणून श्री. एम. व्ही. सावंत यांना विद्यापीठाने दिलेली मान्यता कायदेशीर आहे काय ?

उत्तर : होय.

उपप्रश्न : सदरचे महाविद्यालयास १२(ब) ची मान्यता आहे का ?

उत्तर : नाही.

**प्रश्न क्र. ३/१** सोलापूर विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान मंडळाकडे १२-बी शी संलग्नीत नसताना विद्यापीठातील दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा शासनाच्या आदेशाने बंद केलेले आहे. सदरची केलेली बाब कायदेशीर आहे काय ?

उत्तर : शासनाच्या आदेशाने बंद केलेले नाही.

उपप्रश्न : संचालक उच्च शिक्षण यांचे पत्र आहे का ?
उत्तर : चौकशी समितीच्या अहवालानुसार शिफारस शासनाला कळविले त्याचे पत्र आहे.

**डॉ. बचुटे एम. टी.**

**प्रश्न क्र. १/२** सोलापूर विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयात चालणाऱ्या संशोधन कार्याची माहीती संकलीत केलेली आहे काय ? असल्यास -

**प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे**

उत्तर : होय

उपप्रश्न : महाविद्यालयनिहाय संशोधन प्रकल्पांना मिळणारे (विविध संस्थांकडून) अनुदान किती ?

उत्तर :

| सन | महाविद्यालये संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|
| २००४-०५ | ११ | ३,५०,५००/- |
| २००५-०६ | ७ | ७,२७,०००/- |
| २००६-०७ | ८ | ९,५९,०००/- |
| २००७-०८ | १० | २१,०९,७००/- |
| २००८-०९ | ८ | १८,७०,०००/- |
| २००९-१० | १० | ५९,००,०००/- |
| २००९-१० | ३५ | ५०,८६,०००/- |

**प्रश्न क्र. २/२** महाविद्यालयांमधून संशोधन कार्यास चालना देण्यासाठी विद्यापीठाकडून कोणते प्रयत्न केले जातात / किंवा केले जाणार आहेत ?

उत्तर : अ)राज्यस्तरीय आविष्कार महोत्सवाचे आयोजन
ब) विद्यापीठ अवारात केंद्रीय प्रयोगशाळेची उभारणी
क) संशोधनविषयक कार्यशाळा
ड) संशोधन केंद्राला मान्यता
इ) मार्गदर्शकांची उपलब्धता

उपप्रश्न : संशोधन करणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विद्यापीठाकडून देणार आहे का ?
उत्तर : सद्ध्यपरिस्थितीत नाही.

उपप्रश्न : संशोधन कार्यशाळा आयोजित करण्यासाठी अनुदान दिले जाते का ?
उत्तर : अंशतः अनुदान दिले जाते.

उपप्रश्न : अनुदान वाढविता येईल का ?
उत्तर : वेगळया अधिकार मंडळात विचार करता येईल.

**प्रश्न क्र.३/२** विद्यापीठाच्या विविध विषयांच्या (२ तास वेळ) ५० मार्क्सच्या प्रश्नपत्रिकांच्या उत्तरपत्रीका एका दिवसात किती तपासणे शक्य आहे ?

उत्तर : ५० मार्कांच्या कमीत कमी ८० व जास्तीत जास्त १२० उत्तरपत्रिका एका दिवसात तपासणे शक्य आहे.

उपप्रश्न : जर १२० उत्तरपत्रीका तपासणे अपेक्षीत असेल तर त्या तपासण्याची गुणवत्ता काय ?

उत्तर : गुणवत्तेबाबत सदरची बाब परीक्षा मंडळाच्या विचारारार्थ ठेवण्यात येईल.

उपप्रश्न : विद्या परिषदेमध्ये ५० पेपर तपासण्याचा ठराव झाला आहे त्याप्रमाणे विद्यापीठ कार्यवाही करीत आहे काय ?

उत्तर : सत्र पध्दतीत ५० मार्कांचे ८० - १२० पेपर देतो. वार्षिक पद्धतित १०० मार्कांचे ४०-६० पेपर देतो.

उपप्रश्न : ५० मार्कांचे ६० पेपर देतो का ?

उत्तर : होय.

उपप्रश्न : विद्या परिषद आणि परीक्षा सुधार समितीने घेतलेला निर्णय याचे विद्यापीठ उल्लंघन करीत आहे काय ?

उत्तर : नाही.

**<u>डॉ. बिराजदार भीमाशंकर शरणप्पा</u>**

**प्रश्न क्र.१/३** विद्यापीठात भाषिक संकुल सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही झाली आहे ? त्याचा अंमल काय ?

**प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे**

उत्तर : विद्यापीठात भाषिक संकुल सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठाच्या बृहत आराखड्यात तरतूद करण्यात आली आहे. सदर आराखडयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

उपप्रश्न : कधी करण्यात येईल ?

उत्तर : शासनाकडून इमारतीसाठी निधी व शिक्षक मान्यता दिल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**प्रश्न क्र.२/३** विद्यापीठाच्या एल. आय. सी. कमिटीच्या कामाचे स्वरुप आणि त्याचे नियोजन कोणत्या निकषावर करण्यात येते ?

उत्तर : महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८३ व ८६ नुसार व विद्यापीठ अनुदान आयोग विनियम २००९ कलम ४.७ नुसार एल. आय. सी. कमिटीच्या कामाचे स्वरुप व त्याचे नियोजन करण्यात येते.

उपप्रश्न : एल.आय.सी.वर सदस्य पाठवित असताना सर्वंकश निकष कोणते ?

उत्तर : एल.आय.सी. चे सदस्यांची नांवे बी.सी.यू.डी.ची उपसमिती ठरविते व सेवाजेष्ठतेनुसार सदस्यांची नांवे दिली जातात त्या संकेतानुसार महीला सदस्य सुद्धा शक्यतो असतात.

उपप्रश्न : एल.आय.सी. सदस्य नेमण्यासाठी अधिष्ठाता समिती शिवाजी विद्यापीठाने नेमली आहे त्याप्रकारची समिती आपल्या विद्यापीठात आहे का ?

उत्तर : एल.आय.सी. चे सदस्य नेमण्यासाठी या विद्यापीठात अधिष्ठाता समिती नाही.

उपप्रश्न : उपसमितीचे सदस्य कोण ?

उत्तर : तीन व्यवस्थापन समिती सदस्य व दोन बी.सी.यू.डी.चे सदस्य हे सदर उपसमितीचे सदस्य आहेत.

उपप्रश्न : आपण शिवाजी विद्यापीठाचे परिनियम वापरतो, आपल्या विद्यापीठाने एल.आय.सी. समिती नेमणेसाठी नविन परिनियम तयार केले आहे का ?

उत्तर : शिवाजी विद्यापीठाचेच परिनियम वापरतो नविन परिनियम तयार झालेले नाहीत.

**डॉ. गायकवाड सयाजीराव पांडूरंग**

**प्रश्न क्र.१/४** Which Facilities University provides to Ph.D. students belonging to science faculty particularly subjects which do not have P.G. department in the University campus ?

**प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे**

उत्तर : Research journals, internet facility & library facilities are provided.

**प्रश्न क्र.२/४** Have you taken any steps for establishment of School of Life Sciences in the university campus?

उत्तर : Yes

उपप्रश्न : बृहत आराखडा माहितीसाठी मिळू शकेल का ?

उत्तर : होय.

**प्रश्न क्र.३/४** Is there time limit to the office (concern section) to send Ph.D. thesis to subject expert and subject experts to send their reports to university office?

उत्तर : Yes

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)